www.esakal.com
सकाळ
सातारा, सोमवार, १७ डिसेंबर २०१८

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय

# हुतात्मा जवानांच्या कुटुंबीयांचा सत्कार

## कोरेगावमध्ये विजय दिवसानिमित्त रॅली

**कोरेगाव, ता. १६ :** विजय दिवस कार्यक्रमानिमित्त येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात हुतात्मा जवानांच्या कुटुंबीयांचा सत्कार झाला. या वेळी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली तसेच शहरातून रॅली काढण्यात आली.

विद्यापीठ शहीद स्फूर्ती केंद्र, २२ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी, जिल्हा सैनिक कल्याण मंडळ, विजय दिवस कार्यक्रम समिती व महाविद्यालयातर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून कर्नल शिवाजीराव घाडगे उपस्थित होते. या वेळी शौर्यपदकप्राप्त सुभेदार विजय घाडगे यांचाही विशेष गौरव झाला. रहिमतपूर येथील दख्खनचा राजा पथकाने मर्दानी खेळांची प्रात्यक्षिक सादर केली. सरस्वती इंग्लिश स्कूल, चॅलेंज अॅकॅडमी व शिवतेज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांबावरील कसरती सादर केल्या. सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. नगरविकास कृती समितीचे सी. आर. बर्गे यांनी आभार मानले. दिलीप वेलियावेट्टील, प्राचार्या रूपा जोशी, महादेव भोसले, सुभेदार मिरजी, विष्णूपंत चव्हाण, विजयकुमार घारगे, दीपक देवरे, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे, संतोष नलावडे, शिवाजीराव भोसले आदींसह नागरिक उपस्थित होते.



**कोरेगाव : विजय दिवस कार्यक्रमात सादर झालेली मल्लखांबांची प्रात्यक्षिके.**
(शेखर रसाळ : सकाळ छायाचित्रसेवा)